## नियमपुस्तिका - एक

संस्था, संस्थेची संघटना, कार्य आणि कर्तव्ये यांचे तपशील

**1.1 शासकीय प्राधिका-याचे उद्दिष्ट / हेतू**

**महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचे खाते– सर्वसाधारण माहिती**

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक हे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे वैधानिक लेखापरीक्षक आहेत. मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 78अ खालील तरतुदीनुसार राज्य शासन, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०११ याच्या कलम २ च्या प्रारंभाचा दिनांक म्हणजेच दिनांक १० मार्च २०११ रोजी व तेव्हापासून, विहित करण्यात येतील अशा अटी व शर्तीवर, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा योग्य अधिका-याची महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक म्हणून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करील जो या अधिनियमान्वये जी कर्तव्ये पार पाडण्याविषयी त्यास निर्देश देण्यात आले असतील ती कर्तव्ये पार पाडील. तसेच, महानगरपालिका निधी, पाणी व मलनिःसारण निधी आणि पाणीपुरवठा व मलनिःसारण एकत्रित कर्ज निधी यांच्या लेखापरीक्षेसंबंधी महानगरपालिकेने किंवा स्थायी समितीने त्यास जी इतर कर्तव्ये पार पाडण्यास फर्मावले असेल ती कर्तव्ये आणि बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीच्या लेखापरीक्षेसंबंधी महानगरपालिका किंवा बेस्ट समितीने त्यास जी इतर कर्तव्ये पार पाडण्यास फर्मावले असेल ती कर्तव्ये तो पार पाडील.

1. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 135 (1) खालील तरतुदीच्या अनुपालनार्थ महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक महानगरपालिकेच्या लेख्यांची मासिक तपासणी व लेखापरीक्षा करील आणि त्यावरील अहवाल स्थायी समितीकडे पाठवील व ती समिती तिच्या सदस्यांपैकी दोनपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी व महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने सही केलेला निकटपूर्वीच्या महिन्यातील जमेचा व खर्चाचा गोषवारा दर महिन्यास प्रसिध्द करील.
2. कलम 136 च्या तरतुदीनुसार महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक या अधिनियमाखाली त्यांच्याकडे सोपविलेली इतर कोणतीही कर्तव्ये व त्यास प्रदान केलेले इतर कोणतेही अधिकार यांच्या जोडीला अनुसूची ईई मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्ये बजावील आणि त्यात विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारांचा त्यास वापर करता येईल जे खालीलप्रमाणे आहेत.
   (1) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक या अधिनियमाच्या कलम 78 ब खाली नेमलेले सहाय्यक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी यांचे सहाय्य घेऊन, यात यानंतर तरतूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या लेख्यांची लेखापरीक्षा करील.
   (2) या अनुच्छेदाखाली आपली कार्ये बजावताना महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक
      (i) महानगरपालिकेच्या महसुलातून केलेला खर्च, कर्ज उभारुन केलेल्या कामामुळे आलेला खर्च आणि विशेष निधीतून केलेला खर्च यांची लेखापरीक्षा करील व त्यामध्ये संवितरण केल्याचा म्हणून दाखविलेला निधी ज्या प्रयोजनासाठी व सेवेसाठी उपयोजित करण्यात आला किंवा खर्च करण्यात आला त्या प्रयोजनासाठी किंवा सेवेसाठी तो कायदेशीररित्या उपलब्ध होता व उपयोजित करण्यात आला किंवा कसे याची आणि ज्या प्राधिकाराद्वारे तो खर्च शासित होत असेल त्या प्राधिकारान्वयेच तो खर्च करण्यात आला आहे किंवा कसे याची खात्री करुन घेईल.
      (ii) महानगरपालिकेचे कर्ज, ठेव, कर्ज निवारण निधी, आगाऊ दिलेल्या रकमा, निलंबन आणि भरणा केलेल्या रकमा यांच्या लेखांची लेखापरीक्षा करील आणि त्या लेखासंबंधाने आणि त्या संबंधातील शिल्लक रकमा बरोबर आहेत किंवा नाहीत, या संबंधीच्या पडताळणीतून निष्पन्न झालेल्या गोष्टीसंबंधाने अहवाल देईल.
   (3) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागामध्ये चालविलेल्या वाणिज्यिक सेवांच्या संबंधातील लेख्यांच्या विवरणांची तपासणी व लेखापरीक्षा करील. त्यामध्ये उदीम, वस्तुनिर्माण आणि नफा व तोटा विषयक लेखे आणि जर असे लेखे (महानगरपालिका स्थायी समिती किंवा

मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम समिती) यांच्या आदेशाखाली ठेवण्यात येत असतील तर ताळेबंद यांचा समावेश असेल आणि तो हे लेखे प्रमाणित करील व त्यावरील अहवाल देईल.

(4) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक स्थायी समितीशी विचारविनिमय करुन आणि महानगरपालिकेने दिलेल्या कोणत्याही निदेशांच्या अधीनतेने, महानगरपालिकेच्या लेखांवरील त्याचे अहवाल कोणत्या नमुन्यात व कोणत्या रीतीने तयार केले पाहिजेत तो नमुना व ती रीत निर्धारीत करील आणि हे अहवाल तयार करण्यासाठी आवश्यक असेल ती माहिती देण्यासाठी महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिका-यास बोलावण्याचा प्राधिकार त्यास असेल.

2 (1) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास, त्यास महानगरपालिकेच्या ज्या लेख्यांची लेखापरीक्षा करावी लागणार असेल अशा कोणत्याही लेख्यांच्या संबंधात त्यास योग्य वाटेल अशी विचारणा करता येईल व अभिप्राय व्यक्त करता येतील आणि अशा लेख्यांसंबंधी त्यास योग्य वाटतील अशी प्रमाणके, विवरणपत्रे, विवरणे आणि स्पष्टीकरणे मागविता येतील

(2) पूर्वोक्तानुसार अशी प्रत्येक विचारणा किंवा अभिप्राय ज्याला उद्देशुन लिहिण्यात आला असेल असा अधिकारी किंवा प्राधिकारी तो तात्काळ विचारात घेईल आणि आवश्यक प्रमाणके, दस्तऐवज किंवा स्पष्टीकरण यासहित विनाविलंब मुख्य लेखापरीक्षकांकडे परत पाठवील.

(3) महानगरपालिकेच्या महसुलातून केलेला खर्च अमान्य करण्यासंबंधीचे महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचे अधिकार व अशा खर्चाच्या संबंधातील आक्षेप निकालात काढण्याच्या संबंधातील कार्यपध्दती ही स्थायी समितीने मुख्य लेखापरीक्षकांशी विचारविनिमय करुन तयार केलेल्या व (खर्च महानगरपालिका निधीतून केला जात असेल तर महानगरपालिकेने मंजुरी दिलेल्या व मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम समितीने) मंजुरी दिलेल्या नियमांनी किंवा आदेशांनी विहित केल्याप्रमाणे असेल.

3. ज्या लेख्यांची लेखापरीक्षा करणे आवश्यक असेल अशा कोणत्याही लेखांच्या संबंधातील संपूर्ण लेखापरीक्षेचे काम किंवा लेखापरीक्षेच्या कोणत्याही भागांशाचे काम असे लेखे मुलतः ज्या कार्यालयातील असतील त्या कार्यालयात चालविणे आवश्यक आहे असे महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास वाटेल तर त्यास हे लेखे त्या संबंधातील सर्व पुस्तके व दस्तऐवज यांसहित उक्त कार्यालयात निरिक्षणासाठी सर्व सोईस्कर वेळी उपलब्ध करुन देण्याबाबत फर्मावता येईल.

4. महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास त्यास ज्या लेख्यांची लेखापरीक्षा करणे आवश्यक असेल अशा लेख्यांसंबंधातील कोणतीही पुस्तके किंवा इतर दस्तऐवज निरिक्षणासाठी पाठविण्याविषयी फर्मावण्याचा अधिकार असेल. परंतु जर दस्तऐवज गोपनीय असतील तर त्यांतील मजकूर उघडकीस न येऊ देण्यास तो जबाबदार असेल.

(1) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास लेखापरीक्षेच्या संबंधातील, विशेषकरुन लेखापरीक्षा लागु करण्याची पध्दत व तीची व्याप्ती आणि आक्षेप उपस्थित करणे व त्यांचा पाठपुरावा करणे यासंबंधातील सर्व बाबतीत नियम तयार करता येतील आणि निदेश देता येतील.

(2) महानगरपालिका मुख्य खापरीक्षकाने खर्चास दिलेल्या मंजुरीसंबंधीची लेखापरीक्षा ही महानगरपालिकेने नामनिर्दिष्ट करावयाचा अधिकारी करील.

मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 137 (1) च्या तरतुदीच्या अनुपालनार्थ महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक महानगरपालिकेने केलेल्या खर्चाच्या बाबतीत किंवा तिला येणे असलेल्या रकमांच्या वसुलीच्या बाबतीत किंवा तिच्या लेख्यांच्या बाबतीत ज्या कोणत्याही महत्त्वाच्या अनुचितता किंवा नियमबाह्यता त्यास कोणत्याहीवेळी आढळून येतील त्यासंबंधीचा अहवाल स्थायी समितीस पाठवील.

मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 137(3) च्या तरतुदीच्या अनुपालनार्थ महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक अर्थसंकल्प 'अ' (मुख्य अर्थसंकल्प) 'ब' (सुधार योजना) 'ई' शिक्षण निधी 'ग' (पा.पु.म.नि.) यांच्या संबंधातील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या लेखांवरील लेखापरीक्षा अहवाल स्थायी समितीला माहितीकरिता आणि विचारार्थ सादर करील. तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या

कलम 137 (अ) च्या तरतुदीच्या अनुपालनार्थ महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, अर्थसंकल्प ‘क’ च्या संबंधात बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन समितीस माहितीकरिता व विचारार्थ सादर करील.

## 1.2 शासकीय प्राधिका-याचे उद्दीष्ट / दृष्टी विवरणपत्र

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचे स्वतंत्र विभाग निर्माण करण्याकरिता मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये अशी सुधारणा करण्यात आली ज्यामध्ये अधिनियमाच्या योजनेखाली महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचा दर्जा भारत सरकारच्या अधिनियम 1935 च्या कलम 169 खाली नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या समान केला होता. जी बाब नंतर भारतीय संविधानाच्या चौकटीत सामिल करण्यात आली. वस्तुतः त्यावेळचे मुंबई सरकारचे सचिव, सर्वसाधारण विभाग यांनी महानगरपालिका आयुक्तांना उद्देशुन लिहिलेल्या पत्रव्यवहारात हया बाबीसंबंधी खालीलप्रमाणे निर्दिष्ट केले.

भारत सरकारच्या अधिनियम 1935 च्या कलम 169 अन्वये महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचा अहवाल विधान मंडळापुढे मांडण्याच्या प्रयोजनार्थ गव्हर्नर जनरल किंवा गव्हर्नर यांना (असेल् त्याप्रमाणे) सादर करण्याची आवश्यकता आहे. तसेच विद्यमान संविधानाखाली शासनाच्या लेखांवरील लेखापरीक्षा अहवाल विधान मंडळाच्या वैधानिक समिती – सार्वजनिक लेखा समितीव्दारे तपासण्यात येतो, जी समिती त्यांचा अहवाल आवश्यक कारवाईकरिता विधानमंडळाला सादर करते. पूर्ववर्ती संविधान लक्षात घेता शासनाचे असे मानणे आहे की महानगरपालिकेचे मुख्य लेखापरीक्षक हे महानगरपालिका आणि स्थायी समिती यांना जबाबदार असायला हवे. शिवाय स्थायी समितीला मोठया प्रमाणात वित्तीय अधिकार असल्याचे लक्षात घेता त्यांचे कार्य आणि आदेश मुख्य लेखापरीक्षकांच्या समिक्षेखाली येतील. सबब शासनाला असे वाटते की मुख्य लेखापरीक्षक आपल्या नेमणुकीकरिता त्यांचे ऋणी असायला हवेत, आणि स्थायी समितीच्या वित्तीय व्यवहारासंबंधी अहवाल उच्च प्राधिका-यांना कळवायचा अधिकार असायला हवा. जसा अधिकार शासनाच्या वित्तीय व्यवहारासंबंधी गव्हर्नर जनरल किंवा गव्हर्नर यांना कळवायचा आहे. जसा शासनाचा वित्तीय लेखापरीक्षा अहवाल विधान मंडळाने नेमणूक केलेल्या सार्वजनिक लेखा समितीव्दारे तपासण्यात येतो आहे त्याप्रमाणे मुख्य लेखापरीक्षकांचा अहवाल महानगरपालिका त्या उद्दिष्टाकरिता महानगरपालिकेने विशेषतः नेमणूक केलेल्या वैधानिक लेखासमितीमार्फत तपासू शकते. हे उदिष्ट साध्य करण्याकरिता मुख्य लेखापरीक्षकांनी परस्पर महानगरपालिकेला अहवाल सादर करण्याची आवश्यकता नाही. ते स्थायी समितीमार्फत अहवाल सादर करु शकतात. जी महानगरपालिकेला योग्य वाटेल अशी कारवाई करण्याकरिता तीच्या आदेशासह अहवाल महानगरपालिकेपुढे ठेऊ शकते.

ही शिफारस मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 137 मध्ये समाविष्ट केली आहे. हया कलमाखाली महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक महानगरपालिकेने केलेल्या खर्चाच्या बाबतीत किंवा तिला येणे असलेल्या रकमांच्या वसुलीच्या बाबतीत किंवा तिच्या लेखांच्या बाबतीत ज्या कोणत्याही महत्त्वाच्या अनुचितता किंवा नियमबाहयता त्यास कोणत्याही वेळी आढळून येतील त्यासंबंधीचा अहवाल स्थायी समितीस पाठवील. लेखापरीक्षेच्या प्रगतीबाबत उक्त स्थायी समितीला वेळोवेळी जी माहिती लागेल ती तिला पुरवील. महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने स्थायी समितीस पाठविलेला प्रत्येक अहवाल, अधिनियमाखाली नेमून दिलेली कर्तव्ये व अधिकारांचा वापर करण्याच्या अनुरोधाने महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक यांच्यावर कुठल्या कारणांचा परिणाम होत असेल तर त्यासंबंधी त्यांचे मत, स्थायी समिती सदर मतावर व अहवालासंबंधात दिलेल्या आदेशासह तो अहवाल महानगरपालिकेपुढे ठेवील व महानगरपालिका त्यावर त्यांना योग्य वाटेल ती कार्यवाही करु शकेल. तसेच प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झाल्यावर लगेचच महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक मागील सकारी वर्षाच्या संपूर्ण महानगरपालिका लेख्यांवरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करील.

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांना मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची इइ कलम 135 ते 137 खाली निर्देशिलेल्याप्रमाणे महानगरपालिका स्थायी समिती आणि मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन समिती यांना आवश्यक असेल त्याप्रमाणे महापालिका निधी आणि मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन निधी यांच्या लेखांवरील लेखापरीक्षासंबंधी अन्य कर्तव्ये पार पाडावी लागतील. ते महापालिका आयुक्तांपासून स्वतंत्र आहेत आणि त्यांचे विभाग परस्पर स्थायी समितीच्या अधीन आहेत. महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक स्थायी समितीच्या आदेशांच्या अधीन राहून आपल्या कर्मचारीवृंदावर नियंत्रण आणि देखरेख करतात.

## 1.3 शासकीय प्राधिका-याचे संक्षिप्त पूर्ववृत्त आणि त्यांच्या रचनेचे संदर्भ

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचे खाते मुंबई अधिनियम 2, 1938 – मुंबई महानगरपालिका सुधारित अधिनियमाखाली 1 एप्रील 1938 पासून प्रस्थापित करण्यात आले. त्यापूर्वी महानगरपालिकेच्या लेखा, त्यावेळी अधिनियमामध्ये तरतूद केल्याप्रमाणे, प्रत्येक सरकारी वर्षात नेमलेल्या लिपिक कर्मचारीवृंदाच्या सहाय्याने दुय्यम लेखा सेवेशी संबंधित महानगरपालिका लेखापालांच्या कार्यालयामधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या दोन अधिका-यांकडून तपासण्यात आले.

उपरिनिर्दिष्ट मुंबई महानगरपालिका सुधारित अधिनियम मुंबई अधिनियम 2, 1938 महानगरपालिकेमध्ये लेखापरीक्षेच्या तेव्हा अस्तित्वात असलेल्या व्यापक तपासणीकरिता नेमलेल्या महानगरपालिकेच्या विशेष दुय्यम समितीच्या अहवालाचा परिणाम म्हणून मंजुर करण्यात आला. दुय्यम समितीने त्यांच्या दि. 22 फेब्रुवारी 1929 च्या अहवालात इतर गोष्टींबरोबर आपले असे मत व्यक्त केले की त्या वेळेस महानगरपालिकेने कामास लावलेल्या लेखापरीक्षकांचे शिक्षण उच्च दर्जाचे नव्हते आणि लेखेसंबंधी मोठे प्रश्न सोडविण्याऐवजी त्यांच्या सेवेचा मोठा भाग हा लेखाकार्याच्या नेहमीच्या बाबींशी संबंधित असलेल्या कामाकरिता खर्च होत होता. त्यांचा दृष्टिकोन संकुचित होता. दुय्यम समितीला असे वाटले की महानगरपालिकेकरिता योग्य लेखापरीक्षक हा योग्य योग्यतेचा /दर्जाचा आणि साधारणतः प्रशासकांच्या समोर महानगरपालिकेसंबंधी आपले मुद्दे मांडण्याच्या कुवतीचा असायला हवा. तांत्रिक ज्ञान आणि प्रशिक्षणा व्यतिरिक्तही तो सर्वसामान्य शिक्षणासह योग्यत-हेने सुशिक्षित असायला हवा, तसेच शासकीय कामाचा थोडासा अनुभव आणि सार्वजनिक प्रशासनाचे ज्ञान त्याला असायला हवे आणि त्याला पूर्ण स्वातंत्र, स्थैर्य व त्याच्या कारकीर्दीची त्याला खात्री द्यायला हवी.

हया दुय्यम समितीच्या शिफारशीनुसार मुंबई महानगरपालिका अधिनियमात आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आणि स्वतंत्र लेखापरीक्षा विभाग निर्माण करण्यात आला आणि तो प्रशासकाच्या पासून स्वतंत्र व वैधानिक लेखापरीक्षकाच्या अधीन ठेवण्यात आला व महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक विभाग म्हणून पदनिर्देशित करण्यात आला.

मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 78अ अनुसार राज्य शासनामार्फत महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे आणि महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास गैरवर्तणुकीबद्दल किंवा आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये बजावण्यात त्याने हयगय केल्याबद्दल किंवा ती करण्यात तो असमर्थ झाल्याबद्दल कोणत्याहीवेळी महानगरपालिकेच्या सभेस हजर असलेल्या सदस्यांपैकी दोन तृतीयांशापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी केलेल्या मतदानावरुन अधिकारपदावरुन काढून टाकता येईल. महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक हा आपले अधिकारपद धारण करण्याचे बंद झाल्यानंतर महानगरपालिकेच्या अखत्यारीतील आणखी अधिकारपदे धारण करण्यास पात्र असणार नाही.

## 1.4 शासकीय अधिका-यांची कर्तव्ये

मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीखाली महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांना नेमूदिलेली किंवा प्रदान केलेली कर्तव्ये आणि अधिकार परिशिष्ट 1 मध्ये दिले आहेत.

मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 78 अ च्या तरतुदीखाली (1973 च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.34 खाली सुधारित) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांना मलनिःसारण आणि मलप्रवाह निधी आणि एकत्रित पाणी आणि मलप्रवाह विल्हेवाट कर्ज निधी यांची वैधानिक लेखापरीक्षा पार पाडण्याकरिताची अतिरिक्त कर्तव्ये आणि जबाबदारी सोपविण्यात आली आहेत.

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांना उपरिनिर्दिष्ट नेमून दिलेली / प्रदान केलेली वैधानिक कर्तव्ये आणि अधिकारांव्यतिरिक्त त्यांना पुढील बाबी प्रमाणित करण्याचे अधिकारदेखील दिले आहेत.

1) दि.3 फेब्रुवारी 1931 च्या वित्तीय विभाग पत्र क्र.2471इ आणि दि.18 जून 1931 च्या महापालिका ठराव क्र.2412 अन्वये महानगरपालिकेच्या भांडवली खर्चाच्या आणि किंवा मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम किंवा सुधार योजना इ. कार्यान्वित करण्याकरिता उभारावयाच्या आवश्यक असलेल्या कर्जाकरिता राज्य शासनाच्या मंजुरीकरिता आवेदन पत्रे (परिशिष्ट 2)

2) मुंबई शासन स्थानिक स्वराज्य आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दुय्यम सचिवांकडून दि. 30 मार्च 1953 च्या पत्र क्र.6856/33(1) 15115इ अन्वये सुधार विश्वस्तांच्या भांडवली लेखांच्या संबंधातील तूट भरुन काढण्याकरिता शासनाकडून सहाय्यक अनुदानाकरिता दावे (परिशिष्ट 3)
3) मुंबई शासन, गृह विभागाच्या सहाय्यक सचिवांकडून दि.18 सप्टेंबर 1956 च्या पत्र क्रमांक 3570/7 डी अन्वये शहरातील भटक्या कुत्र्यांच्या विनाशाकरिता केलेल्या उपाय योजनांच्या संबंधात महानगरपालिकेने केलेला खर्च अंशतः भागविण्याकरिता शासनाकडून सहाय्यक अनुदानाकरिता दावे (परिशिष्ट 4)
4) आरोग्य सेवा (दिल्ली) च्या महासंचालकांकडून दि.11 नोव्हेंबर 1965 च्या पत्र क्र.7 माह 14/65'एफपीआय अन्वये मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या कुटुंब नियोजन केंद्रावर केलेल्या खर्चाच्या संबंधात केंद्र शासनाकडून सहाय्यक अनुदानाकरिता दावे (परिशिष्ट 5)
5) शासनाने वेळोवेळी मंजूर केल्याप्रमाणे गलिच्छ वस्ती निर्मुलन योजनांकरिता सहाय्यक अनुदान किंवा अर्थसहाय्याकरिता दावे.

हया विभागाने सुरुवातीपासून कर्मचारीवृंदाच्या भरती संबंधात उच्च दर्जा ठेवला आहे. लेखापरीक्षा कामाकरिता कनिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक या पदाची अर्हता वित्तिय लेखांकन व लेखापरीक्षण किंवा प्रगत लेखांकन आणि लेखापरीक्षण किंवा लेखांकन किंवा लेखापरीक्षण या विषयांसह उत्तीर्ण अथवा लेखा व वित्त (बी.ए.एफ.) किंवा बँकिंग व विमा व्यवसाय (बी.बी.आय.) किंवा व्यवस्थापन अभ्यास (बी.एम.एस.) किंवा वित्तिय व्यवस्थापन (बी.एम.एस.) किंवा वित्तसह व्यवसाय प्रशासन (एम.बी.ए. फायनान्स) वाणिज्य पदवीसह उत्तीर्ण अशी आहे.

कर्मचा-यांच्या भरतीकरिता उच्च दर्जा ठरविला असुनदेखील मा.न्यायमूर्ती श्री.तारखंडे यांनी दिलेल्या निवाडयाखाली केलेल्या शिफारसीनुसार स्थायी समितीच्या दि.23 सप्टेंबर 1971 च्या ठराव क्र.1491 अन्वये मंजूर केल्याप्रमाणे अर्हता नसलेल्या वरिष्ठ व्यक्तींकरिता 25टक्के रिक्त राखीव पदांचे आरक्षण ठेवण्याच्या अधिन, वरिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यकांच्या परीक्षेस बसून उत्तीर्ण झाल्याशिवाय नंतरच्या बढतीकरिता कर्मचारी पात्र नाही.

## 1.5 शासकीय प्राधिका-यांची कार्ये / कर्तव्ये

**लेखांचे परिनिरीक्षण व लेखापरीक्षा**

| | | |
|---|---|---|
| महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकांनी लेखांचे मासिक परिनिरिक्षण करणे व स्थायी समितीने लेखांचे परिनिरिक्षण करणे | | महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक महानगरपालिकेच्या लेख्यांची मासिक तपासणी व लेखापरीक्षा करतील व त्यावरील अहवाल स्थायी समितीकडे पाठवील व ती समिती तिच्या सदस्यांपैकी दोनपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी व महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने सही केलेला निकटपूर्वीच्या महिन्यातील जमेचा व खर्चाचा गोषवारा दर महिन्यास प्रसिध्द करील. तसेच स्थायी समितीस, वेळोवेळी व तिला योग्य वाटेल इतक्या कालावधीच्या संबंधात महानगरपालिकेच्या लेख्यांची स्वतंत्रपणे तपासणी व लेखापरीक्षा करता येईल.<br>2) या प्रयोजनाकरिता स्थायी समितीस व महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास महानगरपालिकेचे सर्व लेखे व त्या संबंधातील सर्व अभिलेखे व पत्रव्यवहार पाहता येईल आणि स्थायी समिती किंवा महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक हे जमा रकमा व खर्च यासंबंधी जो कोणताही खुलासा मागवतील तो, आयुक्त त्यांना ताबडतोब देईल. |

**कलम 136**

1(1) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक या अधिनियमाच्या कलम 78ब खाली नेमलेले सहाय्यक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी यांचे सहाय्य घेऊन यात यानंतर तरतूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या लेख्यांची लेखापरीक्षा करील.

(2) या अनुच्छेदाखाली आपली कार्ये बजावताना महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक –

(1) महानगरपालिकेच्या महसुलातून केलेला खर्च, कर्ज उभारुन केलेल्या कामामुळे आलेला खर्च आणि विशेष निधीतून केलेला खर्च यांची लेखापरीक्षा करील व त्यामध्ये संवितरण केल्याचे म्हणून दाखवलेला पैसा ज्या प्रयोजनासाठी व सेवेसाठी उपयोजित करण्यात आला किंवा खर्च करण्यात आला त्या प्रयोजनासाठी किंवा

सेवेसाठी तो कायदेशीररित्या उपलब्ध होता व उपयोजित करण्यात आला किंवा कसे याची आणि ज्या प्राधिकाराव्दारे तो खर्च शासित होत असेल त्या प्राधिकारान्वयेच तो खर्च करण्यात आला आहे किंवा कसे याची खात्री करुन घेईल.

(2) महानगरपालिकेचे ऋण, ठेव, कर्जनिवारण निधी, आगाऊ दिलेल्या रकमा, निलंबन आणि भरणा केलेल्या रकमा यांच्या लेख्यांची लेखापरीक्षा करील आणि त्या लेखासंबंधाने आणि त्या संबंधातील शिल्लक रकमांबरोबर आहेत किंवा नाहीत यासंबंधीच्या पडताळणीतून निष्पन्न झालेल्या गोष्टीसंबंधाने अहवाल देईल.

(3) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागामध्ये चालवलेल्या वाणिज्यिक सेवांच्या संबंधातील लेख्यांच्या विवरणांची तपासणी व लेखापरीक्षा करील त्यामध्ये उदीम, वस्तुनिर्माण आणि नफा व तोटा विषयक लेखे आणि जर असे लेखे महानगरपालिका, स्थायी समिती किंवा मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रम समिती यांच्या आदेशाखाली ठेवण्यात येत असतील तर ताळेबंद यांचा समावेश असेल आणि तो हे लेखे प्रमाणित करील व त्यावरील अहवाल देईल.

(4) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, स्थायी समितीशी विचारविनिमय करुन आणि महानगरपालिकेने दिलेल्या कोणत्याही निर्देशांच्या अधीनतेने महानगरपालिकेच्या लेख्यांवरील त्याचे अहवाल कोणत्या नमुन्यात व कोणत्या रितीने तयार केले पाहिजेत तो नमुना व ती रीत निर्धारित करील आणि हे अहवाल तयार करण्यासाठी आवश्यक असेल ती माहिती देण्यासाठी महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिका-यास बोलावण्याचा प्राधिकार त्यास असेल.

(2) 1) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास त्यास महानगरपालिकेच्या ज्या लेखांची लेखापरीक्षा करावी लागणार असेल अशा कोणत्याही लेखाच्या संबंधात त्यास योग्य वाटेल अशी विचारणा करता येईल व अभिप्राय व्यक्त करता येतील आणि अशा लेख्यांसंबंधी त्यास योग्य वाटतील अशी प्रमाणके, विवरणपत्रे, विवरण आणि स्पष्टीकरण मागवता येतील.

2) पूर्वोक्तानुसार अशी प्रत्येक विचारणा किंवा अभिप्राय ज्याला उददेशून लिहिण्यात आला असेल असा अधिकारी किंवा प्राधिकारी तो तात्काळ विचारात घेईल आणि आवश्यक प्रमाणके दस्तऐवज, किंवा स्पष्टीकरण यासहित विनाविलंब मुख्य लेखापरीक्षकांकडे परत पाठवील.

3) महानगरपालिकेच्या महसुलातून केलेला खर्च अमान्य करण्यासंबंधीचे महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचे अधिकार व अशा खर्चाच्या संबंधातील आक्षेप निकालात काढण्याच्या संबंधातील कार्यपध्दती ही स्थायी समितीने मुख्य लेखापरीक्षकांशी विचारविनिमय करुन तयार केलेल्या व खर्च महानगरपालिका निधीतून केला जात असेल तर महानगरपालिकेने मंजुरी दिलेल्या नियमांनी किंवा आदेशांनी विहीत केल्याप्रमाणे असेल.

(3) ज्या लेख्यांची लेखापरीक्षा करणे आवश्यक असेल अशा कोणत्याही लेख्यांच्या संबंधातील संपूर्ण लेखापरीक्षेचे काम किंवा लेखापरीक्षेच्या कोणत्याही भागांशाचे काम असे लेखे मुलतः ज्या कार्यालयातील असतील त्या कार्यालयास चालवणे आवश्यक आहे असे महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांना वाटले तर त्यांना, हे लेखे, त्या संबंधातील सर्व पुस्तके व दस्तऐवज यांसहित उक्त कार्यालयात निरिक्षणासाठी सर्व सोईस्करवेळी उपलब्ध करुन देण्याबाबत फर्मावता येईल.

(4) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास त्यास ज्या लेख्यांची लेखापरीक्षा करणे आवश्यक असेल अशा लेख्यासंबंधातील कोणतीही पुस्तके किंवा इतर दस्तऐवज निरिक्षणासाठी पाठविण्याविषयी फर्माविण्याचा अधिकार असेल. परंतु जर दस्तऐवज गोपनीय असतील तर त्यातील मजकूर उघडकीस न येऊ देण्यास तो जबाबदार असेल.

(5) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास लेखापरीक्षेच्या संबंधातील विशेषकरुन लेखापरीक्षा लागु करण्याची पध्दत व तीची व्याप्ती आणि आक्षेप उपस्थित करणे व त्यांचा पाठपुरावा करणे या संबंधातील सर्व बाबतीत नियम तयार करता येतील आणि निर्देश देता येतील.

(6) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकानी खर्चास दिलेल्या मंजुरीसंबंधीची लेखापरीक्षा ही महानगरपालिकेने नामनिर्दिष्ट करावयाचा अधिकारी करील.

(स्थायी समिती आणि मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन समितीव्दारे तयार केलेले संबंधित नियम परिशिष्ट 1 ए आणि 1 बी मध्ये दिली आहेत).

**1.6 शासकीय प्राधिका-यांकडून दिल्या जाणा-या सेवेची यादी आणि त्यावरील संक्षिप्त प्रतिवेदन लेखे**

शासकीय प्राधिकारी म्हणजे महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचे खाते हे जनतेला कोणत्याही प्रकारची सेवा परस्पर देत नाही.

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचे स्वतंत्र खाते निर्माण करण्याकरिता मुंबई महानगरपालिका अधिनियमांमध्ये अशी सुधारणा करण्यात आली ज्यामध्ये अधिनियमाच्या योजनेखाली महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाचा दर्जा भारत सरकारच्या अधिनियम 1935 च्या कलम 169 खाली नियंत्रक व मुख्य लेखापरीक्षक यांच्या समान करण्यात आला. नंतर ही बाब भारतीय संविधानाच्या चौकटीत बसविण्यात आली. वस्तुतः त्यावेळचे मुंबई सरकारचे सचिव सर्वसाधारण विभाग यांनी महापालिका आयुक्तांना उद्देशुन लिहिलेल्या पत्रव्यवहारात हया बाबींसंबंधी खालीलप्रमाणे निर्दिष्ट केले.

भारत सरकारच्या अधिनियम 1935 च्या कलम 169 अन्वये लेखापरीक्षकांचा अहवाल जो विधानमंडळापुढे मांडण्याच्या हेतुने गव्हर्नर जनरल किंवा (गहर्नर असेल त्याप्रमाणे) यांना सादर करायला हवा. तसेच विद्यमान संविधानाखाली शासनाच्या लेखांवरील लेखापरीक्षा अहवाल विधान मंडळाच्या वैधानिक समिती – सार्वजनिक लेखा समिती यांच्याव्दारे तपासण्यात येतो जी त्यांच्या अहवाल आवश्यक कारवाईकरिता विधानमंडळाला सादर करीत असते. सांविधानिक पूर्वदाखला लक्षात घेता शासनास असे स्पष्ट वाटते की महानगरपालिकेचे मुख्य लेखापरीक्षक हे महानगरपालिका आणि त्यांच्या स्थायी समिती यांना जबाबदार असायला हवे.

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक हे वैधानिक लेखापरीक्षक असल्यामुळे ते मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या अर्थसंकल्प "क" धरुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्प “अ”,”ब”,”ई” आणि “ग” ची वैधानिक लेखापरीक्षा पार पाडतात. महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक हे वैधानिक लेखापरीक्षक असुन मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 78अ खाली राज्य शासनामार्फत त्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येते. महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांची कर्तव्ये व अधिकार मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 135 ते 137अ आणि अनुसूची इइ खाली विनिर्दिष्ट केले आहेत. महानगरपालिका अधिनियम 1888 कलम 137 अन्वये महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक अर्थसंकल्प अ,ब, इ आणि ग (सॅप प्रणालीच्या अंमलबजावणीनंतर सद्यस्थितीत त्यांना निधी सांकेतांक 11,12,21,22,23,30, 40, 50, 60 आणि 70 असे निर्देशित केले जाते) यांच्या संबंधातील लेखापरीक्षा अहवाल स्थायी समितीला सादर करते आणि अर्थसंकल्प क च्या संबंधातील अहवाल मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन समितीला सादर करते. अर्थसंकल्प ग चा लेखापरीक्षा अहवाल जागतिक बँकेला पण सादर करण्यात येत होता कारण जुलै 1973 मध्ये जागतिक बँकेच्या प्राधिका-यांच्या सांगण्यावरुन पाणी पुरवठा व मलनिःसारण प्रकल्पाकरिता स्वतंत्र अर्थसंकल्प ग देखील निर्माण करण्यात आला आहे. महानगरपालिकेची कर्ज उभारण्याची व परतफेड करण्याची वित्तीय क्षमता, असे कर्ज उभारण्याकरिता शासन / महानगरपालिकेच्या मंजुरीपूर्वी महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांनी प्रमाणित करायला हवी.

अन्य संकेतमान्य वैधानिक लेखापरीक्षेप्रमाणे महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचे विभाग केवळ महानगरपालिकेच्या लेखांची लेखापरीक्षा करीत नसून महानगरपालिकेच्या विविध कामकाजाच्या व्यवहाराचीदेखील लेखापरीक्षा पार पाडतात. आढळून आलेल्या नियमबाहयतेसह लेखापरीक्षेचे निष्कर्ष, सूचना आणि निरिक्षण संबंधित प्राधिका-यांना स्वतंत्र लेखापरीक्षा टिपण्यामार्फत कळविण्यात येते आणि त्यांचे एकत्रित परिणाम वार्षिक लेखापरीक्षा अहवालामध्ये समाविष्ट करण्यात येतात जो जनतेला विस्तृतपणे खुला आहे.

**1.7 राज्य, संचनालय, प्रदेश जिल्हा गट (जे लागु असेल ते) ही नावे असलेल्या विविध पातळीवरील संघटना संरचना रेखाकृती**

पुढील विवरणपत्रा प्रमाणे

**1.8 जनतेकडून परिणामकारकता आणि कार्यक्षमता वाढविण्याकरिता सार्वजनिक प्राधिका-याची अपेक्षा**

ही बाब महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांच्या विभागाला लागु नाही कारण बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये निर्दिष्ट केलेल्या नियम आणि विनियमानुसार लेखापरीक्षण पार पाडण्यात येते आणि म्हणून जनतेची

परिणामकारकता आणि कार्यक्षमता वाढविण्याची इच्छा असली तरी त्यात बदल करता येणार नाही म्हणून ही बाब लेखापरीक्षा विभागाला लागु करता येणार नाही. तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पध्दतीमध्ये जेव्हा बदल होईल तेव्हा लेखापरीक्षेच्या पध्दतीमध्ये बदल होईल. जर मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये तसे समाविष्ट करण्यात आले तर लेखापरीक्षेची परिणामकारकता आणि कार्यक्षमता वाढविण्याकरिता जनतेकडून आलेल्या सुचनांचे स्वागत करण्यात येईल

**1.9 जनतेचे सहयोग / अंशदान मिळविण्याकरिता केलेली व्यवस्था आणि पध्दत**

हे लेखापरीक्षा विभाग असल्यामुळे जनतेकडून परस्पर सहयोग /अंशदान उचित नाही.

**1.10** सेवा देणे आणि जनतेचे गा-हाणे याचे निर्णय देणे याकरिता नियंत्रण ठेवण्याकरिता कार्यतंत्र उपलब्ध महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाचे विभाग हे परस्पर जनतेच्या कामकाजाशी संबंधित नाही. तथापि महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांच्या विभागाशी संबधित असलेले जनतेचे काही गा-हाणे असल्यास माहिती अधिकार अधिनियमाच्या प्रकरणांसंबंधी कार्यवाही करण्याकरिता नेमलेल्या प्रभारी अधिका-यांव्दारे हाताळण्यात येईल.

**(श्री. मं.सि.गोसावी)**
जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य लेखापरीक्षक
महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचे कार्यालय

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचा विभाग
संघटनेचा तक्ता
महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक

| मुख्य कार्यालय (सामान्य प्रशासन विभाग आणि आस्थापना) | हॉकर्स प्लाझा ऑफीस-दादर (शहर, भ.नि.नि. आणि निवृत्ती वेतन दावे आणि व्यय लेखापरीक्षा विभाग) | वांद्रे कार्यालय (प. उपनगर लेखापरीक्षा विभाग) | चेंबूर कार्यालय (पू. उपनगरे लेखापरीक्षा विभाग) | परळ कार्यालय (सुधार, रुग्णालये, शिक्षण, अग्निशमन दल, भांडार लेखापरीक्षा विभाग) | पा.पु.म.नि.विभाग लेखापरीक्षा उपविभाग शहर (दादर कार्यालय) पू.उपनगरे (घाटकोपर) प.उपनगरे (कांदीवली) | बेस्ट उपक्रम लेखापरीक्षा विभाग कुलाबा कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|
| - | 1 उपमुख्य लेखापरीक्षक | 1 उपमुख्य लेखापरीक्षक | 1 उपमुख्य लेखापरीक्षक | 2 उपमुख्य लेखापरीक्षक | 2 उपमुख्य लेखापरीक्षक | 1 उपमुख्य लेखापरीक्षक |
| 4 लेखापरीक्षा अधिकारी | 26 लेखापरीक्षा अधिकारी | 16 लेखापरीक्षा अधिकारी | 16 लेखापरीक्षा अधिकारी | 35 लेखापरीक्षा अधिकारी | 42 लेखापरीक्षा अधिकारी | 13 लेखापरीक्षा अधिकारी |
| - | 47 व.ले.प.स. | 9 व.ले.प.स. | 5 व.ले.प.स. | 35 व.ले.प.स. | 32 व.ले.प.स. | 11 व.ले.प.स. |
| - | 150 क.ले.प.स. | 53 क.ले.प.स. | 44 क.ले.प.स. | 134 क.ले.प.स. | 82 क.ले.प.स. | 52 क.ले.प.स. |
| 3 मुख्य लिपिक | - | - | - | - | 1 मुख्य लिपिक | - |
| 1 वरिष्ठ लघुलेखक | - | - | - | - | 1 वरिष्ठ लघुलेखक | - |
| 1 वरिष्ठ अनुवादक | - | - | - | - | 1 वरिष्ठ अनुवादक | - |
| 1 कनिष्ठ अनुवादक | - | - | - | - | - | - |
| 2 टंकलेखक | 4 टंकलेखक | 1 टंकलेखक | 1 टंकलेखक | 2 टंकलेखक | - | 1 टंकलेखक |
| 18 लिपिक | 4 लिपिक | 2 लिपिक | 1 लिपिक | 2 लिपिक | 10 लिपिक | 2 लिपिक |
| 1 मुख्य जमादार | - | - | - | - | - | - |
| 1 जमादार | - | - | - | 1 जमादार | 1 जमादार | - |
| 2 हविलदार | 4 हविलदार | 1 हविलदार | - | 2 हविलदार | 4 हविलदार | 1 हविलदार |
| 8 नाईक | 6 नाईक | 2 नाईक | 2 नाईक | 3 नाईक | 9 नाईक | 3 नाईक |
| 12 शिपाई | 11 शिपाई | 9 शिपाई | 5 शिपाई | 5 शिपाई | 8 शिपाई | 5 शिपाई |